# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १६१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.२३ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## माहिती अधिकाराची धार बोथट केल्यास प्राणाची आहुती देईन-अण्णा हजारे

अहिल्यानगर दि.२२ (प्रतिनिधी)- ''माहितीचा अधिकार हा शासनाने जनतेवर केलेला उपकार नसून तो नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, राज्य सरकारने १२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेले महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ हे या कायद्याची धार बोथट करणारे आणि भ्रष्टाचाराला ढाल देणारे आहेत. प्रशासनातील ही हुकूमशाही मोडून काढण्यासाठी आणि माहितीचा अधिकार वाचवण्यासाठी मी माझ्या प्राणाची आहुती देण्यासही मागे हटणार नाही,'' असा थेट आणि निर्वाणीचा इशारा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्य सरकारला दिला आहे. या संदर्भात अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक सविस्तर आणि कडक पत्र पाठवले असून, १२ जूनच्या बेकायदेशीर दुरुस्त्या त्वरित रद्द न केल्यास ५ जुलै २०२६ पासून राळेगणसिद्धी येथील यादवबाबा मंदिरात आमरण उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा दिला आहे. अण्णा हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे की, १९९८ पासून त्यांनी माहितीच्या अधिकारासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे केले आणि अनेकदा ऐतिहासिक उपोषणे केली. मात्र, २० वर्षांनंतर सरकारने केलेल्या नवीन दुरुस्त्या या कायद्याचा मूळ आत्माच नष्ट करणाऱ्या आहेत. जनतेला विश्वासात न घेता हे नियम तयार करण्यात आले असून, यामुळे माहिती देणे अपवाद आणि माहिती नाकारणे हाच नियम अशी उलटी परिस्थिती निर्माण होईल, अशी भीती अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा बोलबाला

### भाजप ११, शिवसेना ३, राष्ट्रवादीने २ जागा जिंकल्या

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा बोलबाला राहिला. तर महाविकास आघाडीची पिछेहाट पाहायला मिळाली. राज्यातील १७ पैकी १६ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर एका जागेवर अपक्ष आणि भाजप बंडखोराचा विजय झाला. भाजप, ११, शिवसेना ३, राष्ट्रवादी काँग्रेस २ आणि अपक्ष १ असा विधान परिषदेचा निकाल लागला आहे. विधान परिषदेच्या १७ जागांसाठी १८ जून रोजी निवडणूक पार पडली होती. मात्र या निवडणुकीआधीच १७ पैकी ६ ठिकाणी महायुतीचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले होते. त्यामुळे आज उरलेल्या ११ जागांचा निकाल समोर आला.

१७ जागांसाठी भाजप ११, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी २ असा महायुतीचा फॉर्म्युला ठरला होता. त्यानूसार भाजपने ११, शिवसेनेने ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसने २ जागांवर निवडणूक लढवली. यापैकी भाजपने ११ पैकी ११ जागा जिंकल्या. राष्ट्रवादी काँग्रेसने २ पैकी २ जागा जिंकल्या. तर शिवसेनेने ४ पैकी ३ जागा जिंकल्या. नाशिकची जागा महायुतीमधील शिवसेनेला सुटली होती. परंतु गोकुळ गीते यांनी बंडखोरी केली आणि त्याचाच फटका शिवसेनेला बसला. नाशिकमधील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा अपक्ष आणि भाजपचे बंडखोर उमेदवार गोकुळ गीते यांनी पराभव केला.

विधान परिषदेच्या १७ जागांवर झालेल्या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत ठरला तो नाशिक मतदारसंघ...नाशिकमध्ये अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार असलेल्या शिवसेनेच्या नरेंद्र दराडेंना पराभवाची धूळ चारली.. महायुतीत नाशिकची जागा शिवसेनेच्या वाट्याला गेली होती.. तिथे नरेंद्र दराडेंना उमेदवारी मिळाली. मात्र, तिथे गिरीश महाजन समर्थक आणि भाजपचे नेते गणेश गीते यांच्यासह त्यांचे बंधू गोकुळ गीतेंनी अर्ज भरून बंडखोरी केली. त्यामध्ये गणेश गीतेंनी मुदतीच्या आधीच अर्ज मागे घेतला. मात्र, त्यांचे बंधू गोकुळ गीते यांनी मुदत संपली तरी अर्ज मागे घेतला नाही. या गोकुळ गीतेंची समजूत काढण्यासाठी गिरीश महाजन, उदय सामंत नाशिकमध्ये तळ ठोकून राहिले. चर्चेच्या डझनभरापेक्षा जास्त फेऱ्या झाल्यानंतर मतदानाच्या काही दिवस आधी गोकुळ गीतेंनी प्रचार थांबवत असल्याचं जाहीरही केलं. पण अर्ज मागे न घेतल्यानं त्यांचं नाव मतपत्रिकेत कायम होतं. त्यांनी त्यांची छुपी रणनीती सुरूच ठेवत या निवडणुकीत विजय मिळवलाय. गोकुळ गीतेंच्या विजयानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत एकच जल्लोष केला.

## ओमराजे निंबाळकरांसह ६ खासदारांचा एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश

### आम्ही कुणाला तुडवायला नाही तर शिवसेना वाढवायला एकत्र-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतून ओमराजे निंबाळकर, संजय जाधव, संजय देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील आणि नागेश पाटील आष्टीकर या सहा खासदारांनी आज पक्षांतर करून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या सहा खासदारांचे प्रवेशानंतर स्वागत केले.

ठाकरेंच्या शिवसेनेतील सहा बंडखोर खासदारांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. बंडखोरांच्या विरोधात ऑपरेशन तुडवा राबवणार असं संजय राऊत म्हणाले होते. त्यांना एकनाथ शिंदेंनी खास आपल्या स्टाईलने उत्तर दिलं आहे. तसंच उपस्थित खासदारांचं कौतुकही केलं आहे.



आम्ही कुणालाही अडवायला नाही, तुडवायला नाही तर शिवसेना वाढवायला एकत्र आलो आहोत.आम्ही कुणाला अडवायला जात नाही, पण कुणी आडवं आलं तर बाळासाहेबांनीच सांगितलं आहे आला अंगावर तर घ्या शिंगावर. २०२२ चा उठाव आपण पाहिला आहे. एका विचारधारेसाठी आम्ही एकत्र आलो होतो. बाळासाहेब ठाकरेंची विचारधारा सोडून दुसरा विचार आला तेव्हा आम्ही तो उठाव केला. तेव्हा अडीच वर्षे काय होतं आणि नंतरची अडीच वर्षे काय झालं ते आपण पाहिलं. आमचा निर्णय लोकांनी स्वीकारला. आम्ही लोकांमध्ये गेलो आणि महाराष्ट्राने उठावाचा निर्णय स्वीकारला असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ४० आमदारांपैकी कुणीही निवडून येणार नाही म्हटलं होतं. मी ते आव्हान स्वीकारलं होतं आणि म्हटलं होतं कुणीही हरलं तरी मी शेती करायला गावी निघून जाईन. आपले ६० आमदार आले, त्यानंतर मी गावी गेलो की काही लोकांना अजूनही पोटदुखी होते असा टोला एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना लगावला. २०२२ ला चाळीस आमदार बरोबर आले होते आज आपण सिक्सर मारला आहे. बाळासाहेब ठाकरेंचे विचार वाचवण्यासाठी आपण तो उठाव केला होता. आता दुसरा टप्पा आहे. आपला उठाव बाळासाहेबांच्या विचारांचा आहे. जिथे शिवसेनेचे विचार तिथे शिवसैनिक त्यामुळेच आज सहा खासदार बाळासाहेबांच्या शिवसेनेत सहभागी झाले आहेत. आपली शिवसेना हे आपलं एक कुटुंब आहे असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

काही लोक उलटसुलट, चुकीच्या बातम्या देत आहेत. आरोप प्रत्यारोप करत आहेत. हे सगळे सहाच्या सहा खासदार म्हणजे बंडु जाधव असतील किंवा इतर कुणीही असेल पण तळागाळासाठी काम करणारा माणूस आहे. या सगळ्यांची कार्यकर्त्यांची बांधिलकी आहे. जमिनीशी नातं ठेवून आहेत. संजय दिना पाटील म्हणजे भाऊ बिनधास्त आणि बेधडक आहे. दोस्ती यारीसाठी उत्तम आहे. संजय हा दीनांचा कैवारी आहे. ओमराजे हे आपल्या मनाचे राजे आहेत. त्यांनी जेव्हा निश्चय केला तेव्हा बरेच प्रयत्न झाले तेदेखील आपल्याबरोबर आले. कार्यकर्त्यांशी चर्चा करुन त्यांनी निर्णय घेतला. काही लोकांनी ओमराजेंना हिणवलं पण त्यांनी काही लक्ष दिलं नाही. त्यांना रिलस्टार म्हटलं त्यांच्याकडे होते तेव्हा रिअल स्टार होते. शिवाय ते रिअल स्टारच आहेत.

## कोचिंग क्लासच्या भीषण अग्नीतांडवात १५ विद्यार्थ्यांचा मृत्यू, लखनौमधील थरारक घटना

लखनौ दि.२२ (वृत्तसंस्था)- उत्तर प्रदेशातील लखनौच्या अलिगंजमधील पुरानिया परिसरात आज धक्कादायक घटना घडली आहे. या परिसरातील एक तीन मजली इमारतीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावर कोचिंग सेंटर होते. त्यामध्ये अनेक विद्यार्थी अडकले होते. मिळालेल्या माहितीनुसार या आगीत १५ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

लखनौमधील आगीतील मृतांचा आकडा वाढला आहे. रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार या आगीत १५ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फोनवरून बचाव कार्याची माहिती सातत्याने घेत आहेत. उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी सांगितले की, लखनौमधील आगीत एकूण १५ मुलांचा मृत्यू झाला असून चार जण जखमी झाले आहेत. बचावकार्य पूर्ण झाले असून, संपूर्ण सरकार पीडित कुटुंबांच्या पाठीशी उभे आहे. उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. कोणालाही सोडले जाणार नाही आणि कठोर कारवाई केली जाईल. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अलीगढमधील आपले सर्व कार्यक्रम रद्द केले असून ते लवकरच



घटनास्थळी जाणार आहेत.

लखनौमधील आगीच्या घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपयांची मदत जाहीर केली. जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

ही आग अचानक लागली. (पान ४ वर)

## ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांचा राजीनामा

लंडन दि.२२ (वृत्तसंस्था)- ब्रिटनच्या राजकारणातून अत्यंत मोठी बातमी समोर येत आहे. अंतर्गत वाढत्या दबावापुढे अखेर झुकत ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. लेबर पार्टी अंतर्गत गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्या नेतृत्वावर नाराजी व्यक्त केली जात होती. सातत्याने घसरणारी लोकप्रियता आणि पक्षातच होणारा विरोध यांमुळे अखेर सोमवारी त्यांनी पायउतार होण्याचा निर्णय घेतला. नवीन उत्तराधिकारी मिळेपर्यंत ते हंगामी पंतप्रधान म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.

## विश्वासघात झालाय, आम्ही सरकारला सोडणार नाही-आ.रोहित पवार

### २९ जूनला छत्रपती संभाजीनगरात महाआंदोलनाचा इशारा

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील अटी-शर्तीवरून सध्या राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी या मुद्द्यावरून राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ''सरकारने शेतकऱ्यांचा विश्वासघात केला असून, ही कर्जमाफी योजना पूर्णपणे फसवी आहे,'' असा घणाघाती आरोप करत रोहित पवारांनी येत्या २९ जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथे महाविकास आघाडीच्या वतीने महाआंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

रोहित पवार यांनी नुकत्याच पंढरपूर येथे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा संदर्भ देत सरकारवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले, ''पंढरपूरमध्ये २६ शेतकऱ्यांसह आम्ही अन्नत्याग आंदोलन केले होते. त्यावेळी सरकारच्या वतीने मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः फोन करून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली होती आणि २२ तारखेपूर्वी तातडीने बैठक घेऊन शेतकऱ्यांचे मुद्दे ऐकण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, सरकारने तो शब्द पाळला नाही. हा थेट शेतकऱ्यांचा विश्वासघात आहे.''

सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना रोहित पवार म्हणाले, कर्जमाफी योजनेत इतक्या जाचक अटी टाकण्यात आल्या आहेत की, तब्बल ४४ लाख शेतकरी या कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. राज्यातील ५५ लाख शेतकऱ्यांपैकी फक्त काही मोजक्याच शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. ही योजना केवळ नावापुरती कर्जमाफी असून, प्रत्यक्षात अनेक अटी लावून शेतकऱ्यांना बाहेर ठेवण्याचे काम सरकारने केले आहे. सरकार केवळ फसवे आकडे दाखवून जनतेची दिशाभूल करत आहे असे रोहीत पवार म्हणाले.

## अखेर राज्यात मान्सून पुढे सरकला, काही दिवसात राज्यातील इतर भागातही मान्सून धडकण्याचा अंदाज

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- दोन आठवड्यांपासून दक्षिण कोकणातील हर्णे आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर येथे स्थिर असलेल्या मान्सूनने आज पुणे आणि रायगड जिल्ह्यातील अलिबागपर्यंत वाटचाल केली आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली. दरम्यान, मुंबईसह राज्यातील इतर भागात लवकरच मान्सूनची वाटचाल होण्यास हवामान स्थिती अनुकूल आहे, असेही हवामान विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

राज्यात सध्या तुरळक ठिकाणी वादळी पावसाची नोंद होत असली तरीही बहुतांश भागात कोरडे हवामान आहे. यंदा तळकोकणात ६ जून रोजी मान्सून दाखल झाला होता. साधारणपणे १५ ते २० जूनच्या आसपास राज्यातील बहुतांशी भागात मान्सूनदाखल होतो. मात्र, यंदा जून महिना संपत आला तरीही राज्यात समाधानकारक पाऊस नोंदला गेला नाही. दरम्यान, रविवारपासून हवामानात बदल होत असून मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी हवामान स्थिती अनुकूल आहे.

राज्यात ८ जूनपासून एकाच (पान ४ वर)

## पावसाळी अधिवेशनाचा पहिला दिवस: विधान भवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांचे आंदोलन

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र विधिमंडळाच्या सन २०२६च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाला आजपासून विधानभवन, मुंबई येथे सुरुवात झाली. पहिल्या दिवसाचे कामकाज वंदे मातरम आणि जय जय महाराष्ट्र माझा या राज्यगीताने सुरू झाले. पहिल्या दिवशी नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी, विविध अध्यादेश व पुरवणी मागण्यांचे सादरीकरण आणि मान्यवरांना श्रद्धांजली वाहणारे शोक प्रस्ताव मांडून सभागृहाचे कामकाज उद्यापर्यंत तहकूब करण्यात आले. सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीलाच नुकत्याच निवडून आलेल्या सुनेत्रा अजित पवार, अक्षय शिवाजीराव कर्डिले या दोन नवनिर्वाचित सदस्यांना विधानसभा अध्यक्षांनी सदस्यत्वाची शपथ दिली. शोक प्रस्तावाकडे वळण्यापूर्वीच विरोधी पक्षातील नेते नाना पटोले यांनी राज्यातील भीषण दुष्काळाचा आणि पाणीटंचाईचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. ''राज्यात अल निनोच्या प्रभावामुळे नद्या, नाले, धरणे आणि तलाव कोरडे पडले आहेत. भूजल पातळी खालावली असून शहरे व गावांमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध नाही,'' अशी भीषण परिस्थिती मांडत त्यांनी मुख्यमंत्र्यांनी यावर सकारात्मक चर्चा घडवून आणावी, अशी मागणी केली.




## डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा चुकीचा असून आम्ही दोघेही स्वतंत्र आणि स्वाभिमानी देशांचे प्रतिनिधित्व करतो-नेतान्याहू

वॉशिंग्टन दि.२२ (वृत्तसंस्था)- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मी जे सांगतो त्यानुसारच इस्त्रायल ऐकतो असं एक विधान केलं होतं. यावर आता इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी हा दावा केला की इस्त्रायलच्या सरकारवर माझं संपूर्ण नियंत्रण आहे. शिवाय इस्त्रायल सरकार माझ्या शब्दाबाहेर नाही. यावर ता नेतान्याहू यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. नेतान्याहू यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा चुकीचा असल्याचे सांगत, आम्ही दोघेही स्वतंत्र आणि स्वाभिमानी देशांचे प्रतिनिधित्व करतो आणि आपल्या राष्ट्रीय हितांसाठी काम करत आहोत, असं म्हटलं आहे.

शुक्रवारी दिलेल्या एका मुलाखतीत डोनाल्ड ट्रम्प यांना प्रश्न विचारला गेला की, इस्त्रायलवर प्रभाव टाकून लेबनॉनवरील पुढील हल्ले थांबवण्याची क्षमता तुमच्याकडे आहे का? त्यावर डोनाल्ड ट्रम्प म्हणाले इस्त्रायलवर माझं पूर्ण नियंत्रण आहे. मी सांगतो तसंच ते करतात. माझ्या निर्णयाला ते विरोध करणार नाहीत हे मला ठाऊक आहे. नेतान्याहू आणि माझे परस्पर राजकीय संबंध हे अतिशय चांगले आहेत. त्यांना मी पूर्णपणे आदर देतो. मात्र ही बाबही खरी आहे की मी पाठिंबा दिला नसता म्हणजेच अमेरिकेचा पाठिंबा नसता तर इस्त्रायलचे अस्तित्वच नसतं असाही दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केला.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या या वक्तव्याबाबत आता बिन्यामिन नेतान्याहू यांनी उत्तर दिलं आहे. एक नेता दुसऱ्याच्या आदेशानुसार कसं काय काम करेल? डोनाल्ड ट्रम्प यांनी जो दावा इस्त्रायलबाबत केला आहे त्यात तसं काही तथ्य मला वाटत नाही असंही नेतान्याहू यांनी म्हटलं होतं. इस्त्रायल (पान ४ वर)

## बंडखोर खासदारांच्या मतदारसंघात उद्धव ठाकरे रणशिंग फुंकणार

### २७ जूनपासून महाराष्ट्र दौरा, पक्षबांधणीसाठी थेट मैदानात

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- शिवसेना (ठाकरे गट) मधून सहा खासदारांनी बंड करत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आता आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत आहेत. बंडखोरीनंतर प्रथमच उद्धव ठाकरे महाराष्ट्रभर दौरा करत थेट कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असून, बंडखोर खासदारांच्या मतदारसंघातूनच ते पक्षबांधणीची नवी मोहीम सुरू करणार आहेत.

या दौऱ्याकडे ठाकरे गटाच्या राजकीय प्रतिआक्रमणाची सुरुवात म्हणून पाहिले जात आहे. पक्षातून झालेल्या गळतीनंतर संघटना पुन्हा मजबूत करणे, कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि जनाधार कायम असल्याचा संदेश देणे हा या दौऱ्यामागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.

उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्याची सुरुवात २७ जूनपासून होणार आहे. पहिली सभा सकाळी १० वाजता यवतमाळ येथे होईल. हा मतदारसंघ बंडखोर खासदार संजय देशमुख यांचा मानला जातो. यानंतर दुपारी २ वाजता वाशीम येथे कार्यकर्ता मेळावा आणि जाहीर सभा होणार आहे. वाशीम जिल्ह्यातही संजय देशमुख यांचा प्रभाव असल्याने (पान ४ वर)

## राम मंदिर देणगी गैरव्यवहार चौकशीसाठी याचिका; तातडीने सुनावणीस अलाहाबाद उच्च न्यायालयाचा नकार

लखनऊ दि.२२ (वृत्तसंस्था)- अयोध्या येथील राम मंदिरातील देणगी व्यवस्थापनात झालेल्या कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी देण्यास अलाहाबाद उच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला. या प्रकरणात कोणतीही आणीबाणी किंवा तातडी नसल्याचे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठासमोर सोमवारी एकूण ५२९ नवीन प्रकरणांपैकी ही याचिका ३९२ व्या क्रमांकावर सूचिबद्ध होती. न्या. पंकज भाटिया आणि न्या. अमिताभ कुमार राय यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने सांगितले की, न्यायालय आधीच मोठ्या संख्येने प्रकरणांवर काम करत आहे, त्यामुळे या प्रकरणावर तातडीने सुनावणी घेण्याचे कोणतेही कारण नाही. खंडपीठाने तोंडी निरीक्षण नोंदवताना असेही म्हटले की, राज्य (पान ४ वर)

## ममता बॅनर्जी यांना अध्यक्षपदावरून हटवले, तर अभिषेक बॅनर्जी थेट पक्षातून निलंबित

### तृणमूल काँग्रेस म्हणवून घेणाऱ्या गटाचा प्रस्ताव मंजूर

कोलकाता दि.२२ (वृत्तसंस्था)- महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीच्या पॅटर्नची पुनरावृत्तीनंतर त्याच्या पुढचे पाऊल उचलले गेल्याचे आता पश्चिम बंगालमध्ये पाहायला मिळत आहे. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत संघर्षाने सोमवारी अत्यंत टोकाचे वळण घेतले. आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर गटाने थेट पक्षाचे सर्वेसर्वा अभिषेक बॅनर्जी यांना पक्षातून निलंबित केले आहे. इतकेच नव्हे, तर ममता बॅनर्जी यांनाही पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावरून हटवण्याची अधिकृत घोषणा या गटाने केली आहे. स्वतःला खरी तृणमूल काँग्रेस म्हणवून घेणाऱ्या या गटाने नवीन संघटनात्मक समिती स्थापन करून हा प्रस्ताव मंजूर केला.

न्यू टाउनमधील एका हॉटेलमध्ये बंडखोर गटाची ही अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला टीएमसीचे अनेक बंडखोर आमदार (पान ४ वर)

# प्रादेशिक पक्षांचं अस्तित्व

केंद्रात सत्ता स्थापन करण्यासाठी झालेली धडपड त्यानंतर मिळालेला कौल असा प्रवास करत २०१४ पासून भाजपने केंद्रात आपला भरभक्कम जम बसवला. सध्या देशाच्या ७८ टक्के भूभागावर आमची सत्ता आहे, असा भाजपचा दावा आहे.

महाराष्ट्रात 'उबाठा'त पडलेली फूट आणि त्याच वेळेला पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचं झालेलं पूर्ण विघटन यामुळे प्रादेशिक पक्षांच्या अस्तित्वाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. सत्तेचे भागीदार असेपर्यंत प्रादेशिक पक्षांचा संसार सुरळीत चालतो; पण सत्ता गमावताच हे प्रादेशिक पक्ष एखाद्या पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळतात. त्यामुळे, प्रादेशिक पक्षांची बांधणी, त्याला सत्तेचा असलेला गोंद आणि त्यांची काळाशी सुसंगतता या तीनही मुद्द्यांच्या आनुषंगाने गंभीर चर्चा करण्याची गरज भासू लागली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळालं, तेव्हा काँग्रेस हा एकच एक मजबूत राष्ट्रीय पक्ष होता. त्या काँग्रेसच्या पोटात विविध प्रादेशिक गट, मध्यम आणि डाव्या विचारसरणीचे (किंचित उजवेही) गट होते. फाळणी आणि त्यानंतर म. गांधींची हत्या या दोन लागोपाठ घडलेल्या दुर्घटनांनी भारतीय लोकशाहीची नौका डळमळेल, असा अनेक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा अंदाज होता. पण, तो खोटा ठरला. तत्कालीन सर्व राजकीय पक्षांनी आपापसातील मतभेद कायम ठेवून, त्याबाबत जाहीर टीकाटिप्पणी करूनही या दोन्ही प्रसंगातून भारताचं स्वातंत्र्य आणि लोकशाही प्रक्रिया व्यवस्थित तारून नेली. भारतासारख्या प्रचंड विविधता आणि अंतर्विरोध असलेल्या देशात एकच एक पक्ष आणि त्याभोवती सर्व राजकारण फिरत राहणं अवघड होतं.

त्यामुळे साठच्या दशकातच विविध राजकीय पक्षांची ताकदीने उभारणी सुरू झाली आणि त्याद्वारे देशात मोठं राजकीय ध्रुवीकरण झालं. १९६२ च्या निवडणुकीपासूनच त्याच्या पाऊलखुणा दिसू लागल्या होत्या. ८०-९० च्या दशकात प्रादेशिक पक्षांनी चांगला जोर धरला आणि त्यांचं 'सिंडिकेट' काँग्रेसच्या सत्तेला थेट आव्हान देऊ लागलं. काँग्रेसची ताकद या आव्हानाने कमी होत असताना आणि दुसऱ्या समर्थ राष्ट्रीय पक्षाचा प्रभावी उदय तोपर्यंत झाला नसल्याने छोट्या प्रादेशिक पक्षांना आपापसातील समीकरणं बदलत केंद्र सरकारच्या घडण्या-बिघडण्यात मोठा वाटा उचलण्याची संधी मिळाली. त्यानंतर 'अयोध्ये'ची लाट आली; त्यात दुसऱ्या राष्ट्रीय पक्षाचा दमदार पर्याय उभा राहिला. सुरुवातीला केंद्रात सत्ता स्थापन करण्यासाठी झालेली धडपड त्यानंतर मिळालेला कौल असा प्रवास करत २०१४ पासून या पक्षाने केंद्रात आपला भरभक्कम जम बसवला. सध्या देशाच्या ७८ टक्के भूभागावर आमची सत्ता आहे, असा भाजपचा दावा आहे.

भारतीय मतदाराने केंद्रात भारतीय जनता पक्षाला कौल दिला आणि लगेच राज्यांची सूत्रं त्यांच्या हाती दिली, असं झालं नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारख्या प्रभावी नेत्याच्या हाती केंद्राची सूत्रं दिल्यानंतर या पक्षाने आपल्या सत्ताविस्ताराची सूत्रं गृहमंत्री अमित शहा यांच्या हाती सोपवली. सुरुवातीला प्रत्येक राज्यात तिथल्या प्रभावी प्रादेशिक पक्षाला हाताशी धरूनच भाजपला राज्याराज्यात सत्तेत पाय ठेवता आला. ओदिशात बिजू जनता दल, आंध्र प्रदेशात तेलुगू देसम पार्टी, पंजाबात शिरोमणी अकाली दल, काश्मीरमध्ये पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी, तामिळनाडूत अण्णा द्रविड कळघममध्ये, महाराष्ट्रात शिवसेना, बिहारमध्ये संयुक्त जनता दल, उत्तर प्रदेशात काही काळ बहुजन समाज पक्ष-अशी मोठी यादी आहे. केवळ दाखला म्हणून त्या त्या राज्याच्या प्रमुख पक्षांची नावं इथे घेतली आहेत. प्रत्यक्षात केंद्रात सत्ता स्थापन करण्यासाठी आणि राज्यातील सत्ता हस्तगत करण्यासाठी भाजपने कितीतरी स्थानिक पक्षांशी जमवून घेतलं; आपल्या मित्र पक्षांची यादी विस्तारत नेली. संघराज्य असणाऱ्या भारतात सत्ता मिळवण्याचा आणि तिचा विस्तार करत जाण्याचा हाच व्यवहारी, जवळचा आणि सर्वोत्तम मार्ग होता. एकेकाळी काँग्रेसचे मित्र असलेल्या पक्षांना आकर्षित करण्यासाठी भाजपने आपल्या कठोर वैचारिक भूमिकेला मुरडही घातली. बिहार-उत्तर प्रदेशात 'बिगर काँग्रेसवादा'ने पछाडलेल्या समाजवादी नेत्यांना, त्यांच्या आदर्शांनाही स्थानिक प्रेरणास्थान म्हणून स्वीकारलं; त्यांचे गुणगान केलं आणि पुतळेही उभारले. भाजप पद्धतशीरपणे स्वतःच्या कक्षा अशा रुंदावत असताना नेमका काँग्रेसमध्ये नेतृत्वाचा दुष्काळ पडला. काँग्रेस ज्या प्रादेशिक नेतृत्वाच्या खांद्यावर उभी होती, ते खांदे काँग्रेसकडून एकामागे एक काढून आपल्या खुर्चीसाठी टेकू म्हणून वापरण्याची नीती भाजपने अवलंबली. 'काँग्रेसमुक्त भारत' करण्याचा कार्यक्रम त्यांनी असा मोहीम म्हणून राबवला. त्यामुळे २०१४ नंतर पाच-सात वर्षांतच भाजप देशात बलाढ्य पक्ष म्हणून उभा राहिला. काँग्रेसने आपली बहुतेक भूमी याच काळात गमावली.

ज्या प्रादेशिक पक्षांची मदत भाजपने घेतली, ते पक्ष आज कुठे आहेत? असा प्रश्न भाजपचे विरोधक नेहमी विचारतात. त्याचं पहिलं उत्तर 'ते सर्व भाजप बरोबरच आहेत' हेच येतं. फक्त त्यांच्या राजकीय बलाबलात आता फरक झाला आहे. म्हणजे, जिथे कधीकाळी भाजपने त्यांचा आधार घेतला होता, तिथे आज ते भाजपच्या आधाराने उभे आहेत किंवा सत्तेत आहेत! याला कारण जागतिक परिस्थिती आणि त्या आनुषंगाने बदललेलं देशांतर्गत राजकारण. गेलं तप हे आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्थिरतेचं, युद्धाचं, संघर्षाचं तप होतं. पाकिस्तानला वठणीवर आणणं ही देशाची गरज होती. कोरोनासारखी जागतिक महामारी याच काळात आली. भारताने आपल्या कररचनेत आमूलाग्र सुधारणा याच काळात केल्या. कर संकलन केंद्रात एकवटलं. राज्यांचे कर आकारणीचे अधिकार जवळजवळ संपले. ते फक्त केंद्राच्या कर उत्पन्नातले वाटेकरी झाले. मोदी यांनी देशातील जनतेशी हिंदीतून उत्तम संवाद ठेवलाच; शिवाय आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांची प्रतिमा 'विश्वगुरू' अशी झाली. या सगळ्या धोरणात साहजिकपणे राज्यातील नेतृत्व खुजी दिसू लागली. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मुद्द्यांमध्ये जनमत अडकत गेलं. प्रादेशिक पक्षांनी, त्यांच्या नेत्यांनी या याचा विचार केल्याचं कुठे दिसलं नाही. राजकीय अजेंडा बदलला, राजकारणाचा आवाकाही बदलला. भाजपने जिंकलेल्या या राजकीय पर्यावरणाने प्रादेशिक पक्ष, नेते निष्प्रभ होत गेले. यापुढेही होत जातील. काँग्रेसच्या आधाराने त्यांचं अस्तित्व किती टिकेल? हा या पुढचा प्रश्न आहे.

# विधवा सन्मान : समाजाच्या प्रगल्भतेचा खरा आरसा

दि. २३ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय विधवा दिन' म्हणून जगभरात पाळला जातो. हा दिवस केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून समाजातील अत्यंत संवेदनशील, अनेकदा दुर्लक्षित आणि शांतपणे वेदना सहन करणाऱ्या विधवा स्त्रियांच्या जीवनातील वास्तवाकडे पाहण्याची एक गंभीर संधी आहे. समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकास, औद्योगिकीकरण किंवा तंत्रज्ञानातील प्रगतीने होत नाही, तर त्या समाजात दुर्बल घटकांना मिळणारे सन्मान, सुरक्षा आणि समान संधी यावरून खऱ्या अर्थाने ठरते. या निकषावर पाहिले असता विधवा स्त्रियांची स्थिती हा समाजाच्या अंतर्मनाचा आरसा ठरतो. हा आरसा आपल्याला केवळ प्रगती दाखवत नाही, तर अनेक ठिकाणी असलेल्या असमानता, परंपरागत मानसिकता आणि सामाजिक उदासीनतेचेही स्पष्ट प्रतिबिंब दाखवतो. त्यामुळे हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा दिवस आहे.

विधवा स्त्रीचे जीवन हे अचानक कोसळलेल्या भावनिक व सामाजिक भूकंपासारखे असते. विवाहानंतर मिळालेला सहजीवनाचा आधार, भावनिक सुरक्षितता, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक ओळख पतीच्या निधनानंतर एका क्षणात बदलून जाते. त्या क्षणी तिच्या जीवनात केवळ दुःख नसते, तर अनिश्चितता, भीती, जबाबदाऱ्या आणि संघर्ष यांचा मोठा डोंगर उभा राहतो. मुलांचे संगोपन, घराचा आर्थिक भार, समाजाचा दृष्टिकोन आणि स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न हे सर्व एकाच वेळी तिच्यासमोर उभे राहते. अशा परिस्थितीत अनेक स्त्रिया स्वतःच्या भावना बाजूला ठेवून कुटुंबासाठी जगण्याचा प्रयत्न करतात. त्या संघर्षाची किंमत मात्र समाज अनेकदा ओळखत नाही. हा अदृश्य संघर्ष या प्रश्नाची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

भारतीय समाजाच्या इतिहासात स्त्रीचे स्थान अनेक बदलांमधून गेले आहे. प्राचीन काळात काही प्रमाणात स्त्रीला शिक्षण, संपत्ती आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग होता. परंतु कालांतराने सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक घटकांमुळे तिच्यावर बंधने वाढत गेली. विशेषतः मध्ययुगीन काळात सती प्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाहावर बंदी आणि कठोर सामाजिक रूढी यांनी स्त्रीचे जीवन अधिक कठीण केले. आधुनिक भारतात कायद्याच्या माध्यमातून या अमानुष प्रथांवर बंदी घालण्यात आली असली तरी समाजातील मानसिकता पूर्णपणे बदललेली नाही. आजही काही भागांमध्ये विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढींच्या चौकटीत अडकलेला दिसतो. त्यामुळे कायदेशीर प्रगती आणि सामाजिक मानसिकता यामध्ये एक मोठी दरी आजही अस्तित्वात आहे.

विधवा स्त्रियांच्या जीवनातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे आर्थिक असुरक्षितता. पतीच्या निधनानंतर कुटुंबाचा आर्थिक आधार अचानक नाहीसा होतो किंवा अत्यंत कमी होतो. ज्या स्त्रिया गृहिणी असतात, त्यांच्याकडे स्वतःचे उत्पन्नाचे साधन नसते. त्यामुळे त्या पूर्णपणे कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. हे अवलंबित्व अनेकदा त्यांच्या स्वाभिमानावर परिणाम करते. काही वेळा त्यांचा आर्थिक निर्णयांवर अधिकारही कमी होतो. वारसा हक्क, मालमत्ता, बँक व्यवहार आणि सरकारी लाभ याबाबत त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कायद्याने अधिकार दिले असले तरी प्रत्यक्ष जीवनात माहितीचा अभाव, कागदपत्रांची गुंतागुंत आणि सामाजिक दबाव यामुळे त्या अधिकारांचा उपयोग अनेकदा होत नाही. परिणामी आर्थिक स्वावलंबनाचा अभाव त्यांना दीर्घकाळ असुरक्षित ठेवतो.

सामाजिक दृष्टिकोन हा या प्रश्नाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. समाजात अजूनही काही ठिकाणी विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सहानुभूतीचा नसून उपेक्षेचा आहे. तिला शुभकार्यांपासून दूर ठेवणे, तिच्या वेशभूषेवर निर्बंध घालणे, तिच्या उपस्थितीला अशुभ मानणे किंवा तिला दुय्यम स्थान देणे अशा अनेक प्रथा काही भागांमध्ये आजही दिसतात. या प्रथा केवळ अंधश्रद्धा नसून त्या मानवी प्रतिष्ठेच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणाऱ्या आहेत. स्त्रीचे मूल्य तिच्या वैवाहिक स्थितीवर ठरवणे ही मानसिकता समाजाच्या प्रगतीला अडथळा निर्माण करते. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच असतो जिथे प्रत्येक व्यक्तीला तिच्या मानवी अस्तित्वावर सन्मान दिला जातो.

मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत संवेदनशील असते. जीवनसाथीचा मृत्यू हा एक गंभीर भावनिक आघात असतो. त्या आघातातून सावरण्यासाठी वेळ, आधार आणि सहानुभूती आवश्यक असते. परंतु सामाजिक अपेक्षा इतक्या तीव्र असतात की स्त्रीला स्वतःच्या दुःखासाठीही वेळ मिळत नाही. तिला लगेचच कुटुंबाची जबाबदारी स्वीकारावी लागते आणि समाजाच्या नियमांनुसार वागावे लागते. या प्रक्रियेत तिच्या भावनांना व्यक्त होण्याची संधी मिळत नाही. एकटेपणा, नैराश्य, भविष्याची अनिश्चितता आणि भीती या भावना तिच्या मानसिक आरोग्यावर खोल परिणाम करतात. मानसिक आरोग्याचे प्रश्न अनेकदा दिसत नाहीत, परंतु त्यांचा परिणाम संपूर्ण जीवनावर होतो.

शिक्षणाचा अभाव आणि कायदेशीर जागरूकतेचा अभाव हे देखील मोठे अडथळे आहेत. ग्रामीण भागात अनेक स्त्रियांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची माहिती नसते. वारसा हक्क, पुनर्विवाहाचा अधिकार, सरकारी योजना, पेन्शन सुविधा आणि सामाजिक सुरक्षा योजना याबाबत अज्ञान असल्यामुळे त्या अनेक लाभांपासून वंचित राहतात. केवळ कायदे तयार करून उपयोग नाही; त्यांची माहिती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. कायदेशीर साक्षरता ही सक्षमीकरणाची पहिली पायरी आहे. माहितीशिवाय अधिकार निरर्थक ठरतात.

सरकारने विधवा स्त्रियांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. विधवा पेन्शन योजना, कौशल्य विकास कार्यक्रम, स्वयंरोजगार योजना आणि पुनर्वसन कार्यक्रम यांचा उद्देश त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे. मात्र या योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचताना अनेक अडचणी येतात.

कागदपत्रांची गुंतागुंत, प्रशासकीय विलंब, माहितीचा अभाव आणि स्थानिक पातळीवरील उदासीनता यामुळे अनेक पात्र स्त्रिया या योजनांपासून दूर राहतात. त्यामुळे या योजनांची अंमलबजावणी अधिक सुलभ, पारदर्शक आणि मानवी दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे.

पुनर्विवाहाचा मुद्दा समाजात अजूनही संवेदनशील मानला जातो. काही ठिकाणी पुनर्विवाह स्वीकारला जातो, तर काही ठिकाणी त्याला विरोध केला जातो. परंतु पुनर्विवाह हा स्त्रीच्या जीवनातील नवीन सुरुवातीचा मार्ग ठरू शकतो. तो तिच्या भावनिक स्थैर्यासाठी, सामाजिक स्वीकारासाठी आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा ठरतो. स्त्रीचे जीवन केवळ एका घटनेपुरते मर्यादित नसते, तर ते सतत पुढे जाणारे असते. त्यामुळे पुनर्विवाहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक मानवी, सकारात्मक आणि स्वीकारशील असणे आवश्यक आहे.

शहरी आणि ग्रामीण भागातील परिस्थितीत मोठा फरक दिसून येतो. शहरी भागात शिक्षण, रोजगार आणि जागरूकता अधिक असल्यामुळे विधवा स्त्रियांचे सक्षमीकरण तुलनेने चांगले झालेले दिसते. परंतु ग्रामीण भागात परंपरा, अंधश्रद्धा आणि सामाजिक दबाव अधिक असल्यामुळे परिस्थिती अधिक कठीण आहे. तरीही स्वयंसेवी संस्था, महिला संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या प्रयत्नांमुळे हळूहळू सकारात्मक बदल घडताना दिसत आहे. हा बदल मंद असला तरी दिशादर्शक आहे.

आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा सर्वात मजबूत पाया आहे. शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास विधवा स्त्रिया आत्मनिर्भर होऊ शकतात. लघुउद्योग, हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, सेवा क्षेत्र, लघु व्यापार आणि डिजिटल कौशल्ये यामधून त्या स्वतःचे जीवन उभे करू शकतात. आर्थिक स्वावलंबन केवळ उत्पन्न देत नाही, तर आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता वाढवते.

समाजाच्या मानसिकतेत बदल घडवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. कायदे आणि योजना असूनही जोपर्यंत समाजाचा दृष्टिकोन बदलत नाही, तोपर्यंत खरे परिवर्तन शक्य नाही. विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन दयेचा नसून समानतेचा असला पाहिजे. तिच्या अस्तित्वाला दुय्यम मानणे हे सामाजिक अन्यायाचे प्रतीक आहे. हा बदल केवळ नियमांनी नाही तर विचारांनी घडतो.

माध्यमांची भूमिका या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी विधवा स्त्रियांच्या प्रश्नांवर सातत्याने प्रकाश टाकणे आवश्यक आहे. त्यांच्या संघर्षकथा, यशोगाथा आणि प्रेरणादायी उदाहरणांमुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. शिक्षण व्यवस्थेची भूमिकाही निर्णायक आहे. शालेय स्तरावर लिंगभाव समानता, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यांचे शिक्षण दिल्यास पुढील पिढी अधिक संवेदनशील बनेल.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही विधवा स्त्रियांच्या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहिले जात आहे. अनेक देशांमध्ये त्यांच्या सक्षमीकरणासाठी विशेष धोरणे राबवली जात आहेत. लिंग समानता, गरिबी निर्मूलन आणि सामाजिक न्याय ही जागतिक उद्दिष्टे या प्रश्नाशी जोडलेली आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ स्थानिक नसून जागतिक आहे.

विधवा स्त्रियांचे सक्षमीकरण हे केवळ त्यांच्यासाठी नव्हे तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. एक सक्षम स्त्री कुटुंबाला स्थैर्य देते, पुढील पिढी घडवते आणि समाजाला दिशा देते. त्यामुळे त्यांच्या विकासात गुंतवणूक करणे हे समाजाच्या भविष्यात गुंतवणुकीसारखे आहे.

शेवटी असे म्हणता येईल की आंतरराष्ट्रीय विधवा दिन हा केवळ स्मरणाचा नाही तर आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा दिवस आहे. समाजाने स्वतःला विचारले पाहिजे की आपण विधवा स्त्रियांना कोणते स्थान देतो, त्यांना किती सन्मान देतो आणि त्यांच्या हक्कांसाठी किती सक्रिय आहोत. सहानुभूती पुरेशी नाही; सन्मान, समानता आणि सक्षमीकरण हीच खरी गरज आहे. विधवा स्त्री ही दयेची नव्हे तर अधिकारांची, आत्मनिर्भरतेची आणि सन्मानाची प्रतीक आहे ही जाणीव समाजात दृढ करणे हीच या दिनाची खरी प्रेरणा आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# आर.पी.जोशी आपुलकी परिवारातील निष्ठावंत अधिकारी

पूर्वाश्रमीच्या युनायटेड वेस्टर्न बँकेत बत्तीस वर्षे कार्यरत असलेले श्री आर.पी. जोशी यांचे काल लहानशा आजारानंतर वयाच्या ८२ व्या वर्षी दुःखद निधन झाले. छत्रपती संभाजी नगर जवळील नेऊरगाव या नदीकाठच्या गावातील वेदशास्त्र संपन्न असे आर.पी जोशी युनायटेड वेस्टर्न बँकेच्या आपुलकी परिवाराचे प्रदीर्घकाळ सदस्य होते. लिपिक पदापासून त्यांची कारकीर्द सुरू झाली. हेड क्लार्क, अधिकारी शाखा अधिकारी अशा परंपरागत बढती प्रमाणे बँकेतील त्यांचा प्रवास सुरू राहिला. ज्या शाखेत जातील तेथील सर्व खातेदारांशी अत्यंत जवळीकेचे संबंध, सर्व कर्मचारी वर्गाशी घरगुती संबंध ही त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये होती. संगणकीकरणा पूर्वीच्या काळात सर्व कामे मॅन्युअल पद्धतीने करण्यात आणि करून घेण्यात त्यांचा हातखंडा होता. त्या काळात व्याजाचे हिशोब, ताळेबंद याची कामे काही आठवडे चालत असत. झालेल्या सर्व कामांचे अचूक मूल्यमापन म्हणजे तपासणी झाल्याशिवाय कोणतेही आकडे ते फायनल करत नसत. तोंडी बेरजा वजाबाक्या, व्याजाचे हिशोब यात त्यांचा हातखंडा होता.

बँक आणि बँकेच्या कामावर अपार निष्ठा हे त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य होते. बँकेच्या विरोधात कुणालाही कधीही ते बोलू देत नसत. ज्या संस्थेत आपण नोकरी करतो या संस्थेबद्दल वाईट विचार करणे ही चुकीचे आहे अशी त्यांची विचारधारा होती. दैनंदिन कामाच्या अचूकतेबद्दल ते सतत जागरूक असत. त्यासाठी कितीही वेळ बसण्याची त्यांची तयारी असे. सहकाऱ्यांकडून काम करून घेण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्यांच्या संपूर्ण नोकरीच्या काळात ते कोणावर कधीही रागावलेले नाहीत. असे



असूनही सर्वांकडून अचूक कामे करून घेणे हे त्यांना सहज शक्य होत असे. खातेदाराच्या कामासाठी उशिरापर्यंत थांबणे हे त्यांना मान्य होते. सणावाराच्या आधी लॉकर्स साठी रात्री उशिरापर्यंत बँक सुरू ठेवण्याची त्यांची तयारी असे. खातेदारांना कधीही नाराज करायचे नाही हे त्यांचे तत्व होते आणि ते त्यांनी आयुष्यभर पाळले. छत्रपती संभाजी नगर, धुळे मालेगाव आणि नोकरीच्या शेवटी पुन्हा छत्रपती संभाजी नगर असा त्यांचा कार्यालयीन प्रवास होता. एका दशकापेक्षा अधिक वर्षे त्यांनी मालेगावात काढली. मालेगाव मधील दोन्ही महादंगलीच्या वेळेस ते मालेगावात होते.

संचारबंदी उठल्यानंतर सर्व कर्मचारी वर्गांच्या घरी जाऊन ख्याली खुशाली विचारण्याची त्यांची पद्धत होती. शाखेमध्ये सर्व कर्मचाऱ्यांशी त्यांचे घरगुती उत्तम संबंध होते. शाखे कडील ब्रह्मचारी वर्गाला महिन्यातून चार ते पाच दिवस त्यांच्या घरी जेवणासाठी आमंत्रण असे.

सार्वजनिक कामांच्या बाबतीत ते अत्यंत चोख असत. १९९८ या वर्षात छत्रपती संभाजीनगर येथे अधिकारी संघटनेचे अधिवेशन घेण्यात आले.

या अधिवेशनाचे ते कोषाध्यक्ष होते. त्या काळामध्ये काही लाख रुपयांच्या खर्चाचे हिशोब त्यांनी अधिवेशन संपताच सात दिवसात सादर करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला होता. अधिवेशनाच्या काळात त्यांच्या बॅगमध्ये काही हजार रुपये नेहमी असत. पैसे सांभाळताना ते अत्यंत सावध असत. संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी पैसे मागितल्यास ते तातडीने देत असत, पण पैसे कशासाठी पाहिजे असे सांगून त्यांची सही ही घेत असत. सार्वजनिक पैशाच्या बाबतीतला त्यांचा हा स्पष्टवक्तेपणा त्यांच्या स्वभावाचा भाग होता. त्यांनी सही मागितल्यावर कोणतेही पदाधिकाऱ्याला कधीही राग आलेला नव्हता हे विशेष! अधिवेशन काळात त्यांनी काही काळ रजा घेऊन पूर्णवेळ अधिवेशनाचे काम केले. कौटुंबिक आघाडीवर सर्व मुलांकडे त्यांचे बारीक लक्ष असे. त्यांची दोन्ही मुले आणि मुलगी ही उच्चशिक्षित असून मुलीच्या गायन कलेसाठी त्यांनी नेहमी उत्तेजन दिले. मुलांच्या अभ्यासाकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे. त्यांच्या घरी वंशपरंपरेने नरसिंह जयंती आणि त्याचे पारणें हे उत्सव होते.

मालेगावात असेपर्यंत या कार्यक्रमाला सर्व कर्मचारी, अधिकारी सहकुटुंब उपस्थित राहत होते, याशिवाय जवळचे खातेदारही या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहत असत. निवृत्तीनंतरही बँकेच्या सर्व कर्मचारी वर्गाशी त्यांचे अत्यंत घनिष्ठ संबंध होते. त्यांच्या घरी सर्वांचे नियमित जाणे येणे होत असे. त्यांच्या निधनामुळे जुन्या पिढीतील आपुलकी परिवारातील एक हिरा गळून पडला आहे. आपुलकी परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची ईश्वर ताकद देवो.

**– डॉ. अभय मंडलिक**

# 'करा योग-पळवा रोग'

## – धोंडीरामसिंह राजपूत यांचे प्रतिपादन

वैजापूर, दि. २२ (प्रतिनिधी) – 'करा योग-पळवा रोग' असे उद्गार सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी येथील पालिकेच्या पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयात

आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात रविवार(दि.२१) रोजी काढले. या वर्षीचे योगाचे ब्रीद वाक्य आहे. 'वाढत्या वयाच्या निरोगी जीवना साठी योगा', याचा आधार घेत राजपूत यांनी सर्व वयाच्या नागरिकांना आपल्या शारिरीक क्षमतेनुसार योगा नियमित व दररोज करून निरोगी जीवन जगावे असे आवाहन केले.या प्रसंगी मुख्याध्यापिका नीता पाटील व पालिका पर्यवेक्षक किशोर सळुंकर यांची उपस्थिती होती.योग शिक्षक बी.बी.जाधव व क्रीडा शिक्षक बोढरे यांनी ताडासन,भुजंगासन,चक्रासन,, उष्ट्रासन, पद्मासन ,सिद्धासन,वज्रासन अशा विविध आसनांची तसेच हस्त संचकन, उदर संचलन, शवासन या आसनांची कृती व त्यांचे लाभ विशद करुन योगासने विद्यार्थ्यांकडून करवून घेतली.

या प्रसंगी राजश्री बंड, लता सुखासे, वैशाली पगारे, पल्लवी भाकरे, तारा होलप, सुभाष गोमलाडू, संदीप शेळके, श्री, तगरे, ज्योती दिवेकर, सुनीता वसावे, सुवर्णा बोर्डे यांची उपस्थिती होती.

# योग शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद



पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) – आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त येथील पिंपळे सौदागरच्या शिवछत्रपती सिनियर गार्डन मैदानावर भारतीय जनता पार्टी आणि 'द आर्ट ऑफ लिविंग' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित योग शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्साहात सहभाग नोंदविला. 'द आर्ट ऑफ लिविंग'चे सत्यजित भैया यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या योगशिबिरात यावेळी भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे, नगरसेविका कुंदाताई भिसे, नगरसेविका अनिताताई काटे, पवना सहकारी बँकेचे संचालक जयनाथ काटे, समाजसेवक संदेश काटे , संजय भिसे, संदिप काटे, मनोज ब्राह्मणकर, दिनेश काटे , सागर बिरारी, राजेश पाटील, सुप्रिया पाटील, प्रविण कुंजीर, बाळकृष्ण परघळे, प्रणिता अवधूत, डॉ. रश्मी मोरे, बिरारी, दिपक गांगुर्डे, समीर देवरे, विजय पाटील तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिक संघटना, हास्य क्लबचे सदस्य उपस्थित होते.

## वंदे मातरम् विद्यालय आणि रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिन उत्साहात साजरा






छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी) - विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वंदे मातरम् विद्यालय, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. २२ जून २०२६ रोजी विद्यालयात 'जागतिक योग दिन' अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष तथा वंदे मातरमब माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. विशाल सुरासे सर उपस्थित होते.

याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष श्री. अनय फणसळकर, सचिव श्री. मुकुंद पागे तसेच आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. रमेश माणिकराव सोनटक्के, सौ. अलोणिका रमेश सोनटक्के व सौ. स्नेहा शिवशंकर स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच वंदे मातरमब प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. प्रकाशजी मोरे सर आणि वंदे मातरमब बालक मंदिराच्या मुख्याध्यापिका सौ. शारदा उगले मॅडम यांनीही कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती दर्शविली.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देत नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक, मानसिक व बौद्धिक आरोग्य सुदृढ राहते, असा मोलाचा संदेश दिला. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या प्रशिक्षकांनी विविध योगासने, प्राणायाम व ध्यानप्रक्रियेचे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष योगाभ्यासाचे मार्गदर्शन केले. या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगासने सादर केली.

कार्यक्रमाचे सुंदर व प्रभावी सूत्रसंचालन वंदे मातरम् माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक श्री. नितीन खोडके सर यांनी केले. योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये निरोगी जीवनशैली, सकारात्मक विचार आणि नियमित योगाभ्यासाची प्रेरणा निर्माण झाली. या कार्यक्रमास वंदे मातरम् विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. अशाप्रकारे वंदे मातरमब विद्यालय, रोटरी क्लब आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

## डॉ.अशोक सरोदे यांनी स्वत: केले एकाच दिवशी ४ ठिकाणी योगदिन साजरे !




वैजापूर, दि. २२ (प्रतिनिधी) - INO आणि आयुष मंत्रालय, भारत सरकारच्या आदेशानुसार वैजापूरचे प्रख्यात नाडीयोगतज्ज्ञ डॉ.अशोक सरोदे यांनी रविवारी २१ जुन रोजी वेगवेगळ्या वेळेवर ४ ठिकाणी मोफत प्रात्यक्षिकासह आंतरराष्ट्रीय योगदिन साजरे केले.हा त्यांचा ७२ व्या वर्षांच्या वयात अत्भूत स्टैमिना आहे.

भाजपा तर्फे नगराध्यक्ष डॉ.दिनेशभाऊ परदेशी यांच्या सेंट मोनिका इंटरनॅशनल स्कूल मध्ये, कैलास पाटील माध्यमिक विद्यालय + छत्रपती इंटरनॅशनल स्कूल मध्ये, न.प.कर्मचाऱ्यांसाठी न.प.चे सिईओ भागवत बिघोत यांच्या विनंती वरून न.प.गार्डन मध्ये तर चैतन्य ज्येष्ठ नागरिक संघ,साईनाथ कालोणी,वैजापूर येथे.सर्व ठिकाणी शरीर संचालन, विविध योगासने,सूर्यनमस्कार व प्राणायामाची प्रात्यक्षिके सादर करून सुमारे १६०० हुन अधिक विद्यार्थी व नागरिक स्त्री-पुरूषांकडून योगाचा पुर्वाभ्यासासह सराव करवून घेतला.सेंट मोनिका स्कूल मध्ये डॉ. दिनेशभाऊ यांनी डॉ.सरोदे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला या प्रसंगी शिल्पाताई परदेशी, दशरथ बनकर, प्रशांत कंगले, विशाल संचेती, वैशालीताई पवार, जयश्री ताई बागुल, कैलास पवार, संदीप ठोंबरे, बजरंग मगर, प्रेम राजपूत, शैलेश पोंदे, गिरीश चापानेरकर व अन्य कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते तर कैलास पाटील विद्यालयात कदम सर व सर्व शिक्षकवृदांनी सहभाग घेतला.

चैतन्य ज्येष्ठ नागरिक संघातर्फे डॉ. सरोदे यांचा स्पेशल जाहिर सत्कार ठेवण्यात आला होता, डॉ.सरोदे यांनी केलेली ३८ वर्षे विनामुल्य योगसेवा व वयाच्या ७१ व्या वर्षात ४५ वर्षे वयांचे रंगरूप दिसणे या विषयांचा जागतिक तब्बल ५ वर्ल्ड रिकॉर्डसब मध्ये नोंद होणे व याचा भव्य सन्मान पुणे येथे दि.१४ मे २०२६ रोजी जागतिक किर्तिचे व लंडन बुक आफ वर्ल्ड रिकॉर्डसब चे सिईओ मा.प्रो. डॉ.अविनाश सकुंडे यांच्या हस्ते पाचही वर्ल्ड रिकॉर्डसब चे प्रमाणपत्रे एका वातानुकूलित ठिकाणी भव्य समारंभात प्रदान करण्यात आल्याबद्दल हा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ नागरिक अशोक धसे रस, अध्यक्ष साळुंके, जोंधळे आप्पा, धोंडिरामसिंह राजपूत, पोपटराव सरोदे, गंगाधर कदम, नाना व अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.या उपक्रमा बाबत डॉ. सरोदे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सर्व कार्यक्रमांसाठी बी.बी. थोरात, बोडखे नाना, कैलास मतसागर, गलांडे व राहुल व आशिष सरोदे यांनी सहकार्य केले.

## जागतिक योग दिन उत्साहात साजरा ; नियमित योगाभ्यासातून निरोगी व संतुलित जीवन जगण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी) - महानगरपालिकेच्या वतीने आज जागतिक योग दिन गरवारे क्रीडा संकुल येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शहरातील विविध शाळांतील विद्यार्थी, महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत योगासने, प्राणायाम व ध्यानाचा सराव केला.

महापौर समीर राजूरकर म्हणाले, भारताने जगाला दिलेली योग ही अमूल्य परंपरा आज जागतिक स्तरावर स्वीकारली गेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारामुळे गेल्या बारा वर्षांत योगाचा प्रसार जगातील अनेक देशांमध्ये झाला असून योग ही केवळ व्यायामपद्धती नसून निरोगी, आनंदी व संतुलित जीवन जगण्याची कला आहे. प्रत्येक नागरिकाने योगाचा आपल्या दैनंदिन जीवनात समावेश करून निरोगी जीवनाचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.

आयुक्त अमोल येडगे यांनी सांगितले की, योगामुळे शरीर आणि मन निरोगी राहते तसेच जीवनात सकारात्मकता निर्माण होते. आंतरराष्ट्रीय योग दिन केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता वर्षातील सर्व ३६५ दिवस नियमित योगाभ्यास, प्राणायाम आणि ध्यानासाठी वेळ द्यावा. प्रत्येकाने दररोज किमान एक तास स्वतःच्या आरोग्यासाठी देऊन योगाला जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविल्यास निरोगी शरीर, निरोगी मन आणि संतुलित जीवन जगणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते सुनील केंद्रे, स. सदस्या माधुरी अदवंत, सुरेखा सानप, गटनेते किशोर नागरे, आरोग्य सभापती सुनिता साळुंके, स. सदस्य शिवाजी दांडगे, गणेश नावंदर, विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शहरातील विविध शाळांतील विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हा योग असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश निरकर, सचिव तसेच योग प्रशिक्षक छाया सोमवंशी, पूजा सदावर्ते, मंदाकिनी जगताप, पल्लवी भागवत, मीनाक्षी हजारे, सुवर्णा मोरे, एम. आर. जगताप, भाग्यश्री बांगर, व धर्मेंद्र सोमवंशी यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## आंतराष्ट्रीय योग दिन : आबालवृद्धांचा योग सरावात उत्स्फूर्त सहभाग

### बिबी का मकबरा व विभागीय क्रीडा संकूलात सामूहिक योगासन



छत्रपती संभाजीनगर, दि.२१(जिमाका)- आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज जिल्हा प्रशासनामार्फत योगासनांचा सामूहिक सराव केला. बिबी का मकबरा व विभागीय क्रीडा संकूलात मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याशिवाय विविध संस्थांनीही जिल्ह्यात ठीक ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यात आबालवृद्धांनी सहभाग घेऊन योग सराव केला.

सगळ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले.

बीबी का मकबरा येथे आयोजीत मुख्य कार्यक्रमात जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी.एम., अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, केंद्रीय पुरातत्व विभागाच्या अधीक्षक डॉ. शिल्पा जमगाडे,हेमंत होकरे, जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवाल, उपशिक्षणाधिकारी दीपाली थावरे तसेच विविध योग संस्थांचे पदाधिकारी, सदस्य आदी उपस्थित होते.

'निरोगी वृद्धत्वासाठी योग', ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमाचे थेट प्रसारण उपस्थितांना दाखवण्यात आले. त्यानंतर सामूहिक योगासने, प्राणायाम आदींचा सराव करण्यात आला. योग गुरु देवेन लड्डा यांच्या मार्गदर्शनात हा सराव करण्यात आला. भारतीय योग संस्थान, जिल्हा योगासन स्पोर्ट्स असो., द आर्ट ऑफ लिव्हिंग, पतंजली योग संस्था या संस्था या उपक्रमात सहभागी झाल्या. या शिवाय सर्व शासकीय अधिकारी- कर्मचारी, विद्यार्थी, क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, सदस्य, शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी होते.

## योग शिबिराव्दारे दिला निरोगी जीवनाचा संदेश



पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) - निरोगी जीवनशैली, शारिरीक तंदुरुस्ती आणि सकारात्मक विचारांचा संदेश देणाऱ्या योग शिबिरात पिंपळे सौदागर येथील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला . निमित्त होते आंतरराष्ट्रीय योग दिनाचे. सोमवार दि. २१ रोजी नाना काटे सोशल फाउंडेशन आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने कुणाल आयकॉन रोडवरील कै. बाळासाहेब कुंजीर क्रीडांगणांवर या योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही २१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला परिसरातील नागरिक, युवक, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक तसेच विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला

या प्रसंगी आर्ट ऑफ लिव्हिंगचे दत्ता आलेकर, निशा लुल्ला तसेच नगरसेवक विठ्ठल नाना काटे, उमा कुलकर्णी, सामाजिक कार्यकर्ते अनिल काटे, युवानेते उमेश काटे, काळुराम कवितके, संतोष मस्कर, संतोष मिश्रा, रवि मुंढे, विनोद सुर्वे, अमरिश जोशी, संदेश घाटे, जयेश सरोदे, दीपक काळे, सतीश डोंगरे, चेतन पाटील, विलास जोशी तसेच परिसरातील विविध सोसायट्यांमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक पर्जन्यवन दिनानिमित्त पालिका शाळेत से.नि. शिक्षणाधिकारी धोंडीरामसिह राजपूत यांचे व्याख्यान



वैजापूर, दि. २२ (प्रतिनिधी) - संपूर्ण विश्वामध्ये आज पर्जन्य बाबत व वनांच्या रक्षण बाबत तसेच वन्यजीव रक्षणाबाबतअतिशय भयानक स्थिती आहे. अशा भयानक स्थितीत शालेय विद्यार्थ्यांत पाण्याच्या बचत बाबत, वनांच्या रक्षण बाबत तसेच झाडे लावणे व ती जगविणे बाबत तसेच वन्यप्राणी जपवणूक बाबत देशातील सर्वच घटकांनी सर्वंकष प्रयत्न करणे गरजेचे आहे, तरच उद्याचा काळ मानवी जीविताला योग्य व पोषक असेल असे प्रतिपादन सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिह राजपूत यांनी सोमवार(ता.२२) रोजी येथील पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयात जागतिक पर्जन्य वनदिन बाबत आयोजित कार्यक्रमात केले.

या प्रसंगी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका नीता पाटील होत्या.

तर प्रमुख उपस्थितीत बी.बी. जाधव हे सुद्धा हजर होते. जागतिक 'पर्जन्य वन' निमित्त हा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.आरंभी महिला शिक्षणच्या आराध्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पूण अभिवादन करण्यात आले. प्रास्तविक राजश्री बंड यांनी केले. विद्यार्थ्यांनी व्याख्यानात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. या कार्यक्रमात संदीप शेळके, सुभाष गोमलाडू, क्रीडा शिक्षक बोढरे, वैशाली पगारे, ज्योती दिवेकर, श्रीमती सोनवणे यांनीही सहभाग नोंदविला. शेवटी बी.बी. जाधव यांनी आभार मानले.

## जागतिक संगीत दिन: संभाजीनगरच्या कलाकारांनी दिली शहराला मेजवानी; १०० कलाकारांचा अविस्मरणीय अविष्कार




छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरमधील सर्व कलाकारांनी एकत्रित येत जागतिक संगीत दिनी सूर तालाची लयलूट केली. मनमुराद संगीत मेजवानी रसिकांना अनुभवता आली. महानगरपालिकेच्या सहकार्याने झालेल्या या कार्यक्रमाला रंगमंदिरात प्रेक्षकांनी तुडुंब गर्दी केली होती.

कार्यक्रमाचे थाटात उदघाट्न झाले. उपमहापौर राजेंद्र जंजाळ, सभापती अनिल मकरीये, मनपा आयुक्त अमोल येडगे, उपायुक्त अंकुश पांढरे, विश्वनाथ ओक, लक्ष्मीकांत काळे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

स्थानिक कलाकारांनी अवघ्या सहा दिवसात एक अप्रतिम कलाकृती साकारली. कोणताही मोबदला न घेता सर्व कलाकारांनी योगदान दिलं. नांदी ने कार्यकामाला प्रारंभ झाला आणि रंगत वाढत गेली.. नाट्यगीत, बंदिश, तराना ने सुरुवात करत ही आनंदयात्रा अभंगकडून लोकसंगिताकडे वळली. वासुदेव, भारूड, गोंधळ लावणी असे वैविध्य पूर्ण सादरीकरण झाले. हिंदी मराठी गाण्यासोबत गझल आणि पश्चिमात्य रॉक बँड सुद्धा... चकित करणारे सादरीकरण स्थानिक कलाकार करू शकतात हे शहराला पहिल्यांदाच कळलं. स्वरानुभूती आणि तालवाद्य कचेरीने वादकांचे कौशल्य दाखवून दिले.

कलाकारांची एकत्रिकरणाची ही कल्पना समोर आल्यावर महापौर समीर राजूरकर यांनी तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी या संकल्पनेला प्रोत्साहन दिल्याने एक महाराष्ट्रात एखाद्या शहरातील १०० कलाकारांनी एक होऊन विनामोबदला कार्यक्रम केला हे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य ठरले. शहरात विविध संचात काम करणारे कलाकार जागतिक संगीत दिनी एकत्र येतात आणि अविस्मरणीय आनंदयात्रा घडवून आणतात हे पहिल्यांदाच झाले. छत्रपती संभाजीनगर मधील संगीत विश्वाची ही सफर न भूतो न भविष्यती होती. यापुढे दरवर्षी संगीत दिनाच्या निमित्ताने आयोजन करण्याचा संकल्प यावेळी कलाकारांनी केला. स्थायी समती सभापती अनिल मकरिये यांनी यासाठी महानगरपालिका सर्व मदत करेल असे आश्वासन दिले.

## नियमित योगासनाने व्यक्ती शारीरिक, मानसिक, भावनिक दृष्टीने सक्षम राहतो -नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी






वैजापूर, दि. २२ (प्रतिनिधी) - 'नियमित योगासन केल्याने व्यक्ती व विद्यार्थी यांचे शारीरिक, मानसिक ,भावनिक व बौध्दिक आरोग्य सक्षम राहते 'असे उदगार नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी यांनी आंतरराष्ट्रीय योगदिनी रविवार(ता,२१)रोजी येथील सेंट मोनिका इंग्लिश माध्यमाच्या शाळेत योगदिन कार्यक्रम आरंभ करतांना काढले. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी १२वर्षापूर्वी युनोत मांडलेला 'योग-दिनाला' जागतिक मान्यता मिळावी ठराव युनोने मान्य करून दरवर्षी२१जून,हा दिन आंतरराष्ट्रीय योग दिन संपूर्ण जगात साजरा करावा म्हणून सूचना दिल्या तेंव्हापासून.वैजापूरातील सेंट मोनिका इंग्लिश माध्यमाच्या शाळेत ही दरवर्षी योगादिन गेल्या १२वर्षा पासून सातत्याने होत आहे या निमित्ताने या वर्षी ही या योगादिन निमित्ताने रविवार(ता,२१) रोजी सकाळी सात वाजता योगदिन निमित्त योगाचार्य डॉ.अशोक सरोदे यांच्या उपस्थितीत सेंट मोनिका शाळेत विद्यार्थी सोबत शहरातिल नागरिक,महिला व पुरुष यांनी डॉ.सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली योगासने एक तासभर केली.या प्रसंगी माजी नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी तथा जेष्ठ समाजसेवक धोंडीरामसिंह राजपूत, आर.पी,क्षीरसागर,प्रकाश माळी, योग शिक्षक विजय देशमुख, दशरथ बनकर, राजेश गायकवाड, सावन राजपूत, महेश भालेराव, प्रा,जवाहर कोठारी, प्रकाश माळी,जीवन राजपूत , प्राचार्य किशोर साळुंके, सेंट मोनिका इंग्लिश शाळेचे शिक्षक वृंद,व नागरिक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# औरंगाबाद - जालना स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून महायुतीचे सुहास शिरसाट विजयी



छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- विधानपरिषदेच्या औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचा निकाल आज जाहीर करण्यात आला.

या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार सुहास शिरसाट हे विजयी झाले आहेत. त्यांना ४५५ मते प्राप्त झाले आहेत. या निवडणुकीत तीन उमेदवार निवडणूक रिंगणात होते. महाविकास आघाडीचे उमेदवार गणेश लोखंडे यांना १३५ मते प्राप्त झाली असून अपक्ष उमेदवार इसाक खान सांडू खान यांना ३५ मते प्राप्त झाली.

पाच मते अवैध ठरले. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी निकाल जाहीर केला.

# जायकवाडी परिसरात तरुणाची दगडाने ठेचून निर्घृण हत्या; झाडांत आढळला रक्तबंबाळ मृतदेह!

पैठण दि.२२ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील ऐतिहासिक आणि औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचा असलेला पैठण तालुका आज पुन्हा एकदा एका अत्यंत भीषण आणि अंगावर काटा आणणाऱ्या रक्तपाताने हादरून गेला आहे. तालुक्यातीच जायकवाडी उत्तर परिसर रडारवर आला असून, येथे एका २७ वर्षीय तरुणाची लोखंडी गज आणि जड दगडाने तोंडावर व डोक्यावर सपासप वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याचे उघड झाले आहे. अमोल उर्फ प्रभू भास्कर सुरडकर (वय २७ वर्षे, रा. संजयनगर, कातपूर, ता. पैठण) असे या मृत दुर्दैवी युवकाचे नाव आहे. या थरारक आणि क्रूर हत्याकांडामुळे संपूर्ण पैठण शहरासह ग्रामीण भागात भीतीचे आणि दहशतीचे तीव्र वातावरण निर्माण झाले असून, मारेकऱ्यांच्या शोधासाठी पोलिसांनी युद्धपातळीवर चक्रे फिरवली आहेत.

प्राप्त प्राथमिक माहितीनुसार, संजयनगर कातपूरचा रहिवासी असलेला अमोल सुरडकर हा काल रात्रीपासून बेपत्ता होता. आज सोमवारच्या सकाळच्या सत्रात जायकवाडी उत्तर परिसरातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या वेड्या बाभळीच्या दाट झाडीमध्ये काही नागरिकांना एका तरुणाचा रक्ताळलेला मृतदेह अत्यंत छिन्नविच्छिन्न अवस्थेत दिसून आला. नागरिकांनी तात्काळ या घटनेची माहिती स्थानिक पोलिसांना दिली. मारेकऱ्यांनी अमोलचा आवाज दाबून त्याला अत्यंत निर्घृणपणे मारहाण केली होती आणि त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने त्याचा मृतदेह रस्त्याशेजारील दाट झाडीत फेकून दिला होता. या घटनेमुळे कातपूर परिसरात शोककळा पसरली आहे.


हत्याकांडाची माहिती मिळताच पैठण एमआयडीसी (श्घ्उ) पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या ताफ्याने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून छत्रपती संभाजीनगरवरून विशेष फॉरेन्सिक लॅबचे (इदीहेग्म ऊींस) पथक आणि श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. पोलिसांनी मुख्य घटनास्थळाचा सखोल पंचनामा केला असून, तिथून मयतावर हल्ला करण्यासाठी वापरलेले रक्ताने माखलेले जड दगड आणि तीक्ष्ण लोखंडी गज जप्त केले आहेत. फॉरेन्सिक तज्ज्ञांनी गुन्हेगारांचे फिंगरप्रिंट्स आणि तांत्रिक पुरावे फॉरेन्सिक लॅबमध्ये तपासणीसाठी सुरक्षितपणे संकलित केले आहेत.

या खळबळजनक खुनाचा वेगाने तपास करत पैठण एमआयडीसी पोलिसांनी परिसरातील काही संशयित हालचालींच्या आणि गुप्त माहितीच्या आधारे तातडीने मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी या प्रकरणाशी थेट धागेदोरे जोडलेले दोन मुख्य संशयित आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेतले असल्याची अधिकृत माहिती सूत्रांनी दिली आहे.

या क्रूर खुनामागील नेमके मुख्य कारण अद्याप पूर्णपणे स्पष्ट झालेले नसले, तरी प्राथमिक अंदाजानुसार हा खून जुना कौटुंबिक वाद, पैशांची देवाणघेवाण किंवा अंतर्गत वादातून झाला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पैठणच्या उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवला असून, पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली पुढील सखोल तपास सुरू आहे.

# पार्श्वनाथ ब्रह्मचारी आश्रम जैन गुरुकुलचा ६४ वा वर्धापन दिन व श्रुतपंचमी महोत्सव उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- गुरुकुल प्रणालीचे प्रणेते आचार्य समंतभद्र महाराज यांच्या प्रेरणेने आचार्य आर्यनंदी महाराज यांनी सन सन १९६२ यावर्षी श्रुतपंचमीच्या तिथीवर वेरूळ येथे पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुल ही स्थापना केली होती आज रोजी गुरुकुल चा ६४ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आल ा यावेळी परमपूज्य १०८ आचार्य विद्यासागर महाराज यांचे परम शिष्य निर्यापक नियम सागर महाराज तसेच सुपार्श्वसागर महाराज यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त दिनेश गंगवाल तसेच महामंत्री डॉ.प्रेमचंद पाटणी निर्मल कुमार ठोले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आचार्य आर्यनंदी महाराज व समंतभद्र महाराज व विद्यासागर महाराज यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करण्यात आले.




श्रुत पंचमी चे दिवशी पहिला षटखंडागम हा जैन ग्रंथ लिपीबद्ध करण्यात आला त्या विषयीचा इतिहास निर्यापक नियमसागर महाराज यांनी आपल्या प्रवचनातून विद्यार्थ्यांना सांगितला तसेच गुरुकुल स्थापनेतून हजारो विद्यार्थी कसे सुसंकृत झाले व आजच्या काळात संस्काराच्या दृष्टीने गुरुकुलचे असणारे महत्त्व याविषयी उद्बोधन केले. गुरुकुलचे महत्व सांगितले.

यावेळी गुरुकुल मध्ये नवीन प्रवेश विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. जैन धर्माचे प्रमुख ग्रंथ तत्वार्थ सूत्र, रत्न करण्ड श्रावकचार नियमसार, प्रवचनसार, षटखंडागम इत्यादी ग्रंथाच्या बोल्या करण्यात आल्या व या ग्रंथाची मंदिरात स्थापना करण्यात आली.

यावेळी षटखंडागम ग्रंथाचे पूजन करण्यात आले तसेच परमपूज्य १०८ नियम सागर महाराज व सुपार्श्व सागर महाराज यांच्या पाद पक्षालनाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला. कार्यक्रमा त यावेळी स्वागत गीत रूपाली जैन यांनी गायले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास मिश्रीकोटकर व हर्षवर्धन महाजन यांनी केले. अशी माहिती अतुल बादे पियुष कासलीवाल नरेंद्र अजमेरा यांनी दिली.

# शहरातील रस्त्यांवरील पोल शिफ्टिंग व नालेसफाईची कामे तातडीने पूर्ण करा -स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांचे निर्देश



छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी आज महानगरपालिकेच्या विद्युत विभागाचा आढावा घेत शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणारे रस्त्यांवरील सर्व विद्युत पोल तातडीने स्थलांतरित (पोल शिफ्टिंग) करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीत शहरातील प्रमुख बाजारपेठांमधील पैठण गेट ते गुलमंडी तसेच सतीश मोटर्स ते महात्मा फुले चौक आणि महात्मा फुले चौक ते शाहू महाराज चौक या मार्गांवरील पोल शिफ्टिंगची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

त्यानंतर नालेसफाई संदर्भात झोन क्रमांक १ ते १० मधील सर्व झोन अभियंत्यांची बैठक घेऊन शहरातील सर्व नाल्यांची साफसफाई निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. नाल्यांमधून काढण्यात आलेला गाळ रस्त्यावर तसाच पडून राहू न देता तो तात्काळ उचलावा, तसेच नाल्यांवरील अतिक्रमणे हटवून पावसाळ्यापूर्वी पाण्याचा निचरा सुरळीत होईल, यासाठी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करण्यात यावी, अशा स्पष्ट सूचना स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# थुंकण्यास विरोध केल्याच्या कारणावरुन वाद; दोन सख्ख्या भावांवर हल्ला करणाऱ्या आरोपींची बाजारसावंगी गावात धिंड

खुलताबाद दि.२२ (प्रतिनिधी)- तालुक्यातील बाजार सावंगी येथे थुंकण्यास विरोध केल्याच्या क्षुल्लक कारणावरून दोन सख्ख्या भावांवर सहा जणांच्या टोळक्याने जीवघेणा हल्ला केला होता. या घटनेनंतर खुलताबाद पोलिसांनी कारवाई करत मुख्य आरोपींची शनिवारी बाजारसावंगी बाजारपेठेतून धिंड काढून कायद्याचा धाक दाखवला.



बाजार सावंगी येथील एका चहाच्या हॉटेल मध्ये गुरुवारी थुंकण्यास विरोध केल्याने काही युवकांनी राग मनात धरला. त्यानंतर त्यांनी संबंधित दोन सख्ख्या भावांना गाठून लाकडी दांडे, लोखंडी रॉड व इतर हत्यारांच्या सहाय्याने मारहाण केली. या हल्ल्यात दोघांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक लॅबच्या पथकालाही पाचारण केले. अश्विन कारभारी नलावडे, अनिकेत गणेश नलावडे, मनोज अंकुश जाधव आणि आबाराव नलावडे यांना ताब्यात घेतले. तर बबलू शेख आणि शुभम देविदास सराटे हे दोघे अद्याप फरार असून त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. मुख्य आरोपी अनिकेत गणेश नलावडे याच्याविरुद्ध यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहे. पोलिसांनी आरोपींची धिंड काढली.

# पैठणमध्ये मान्सूनची दमदार 'एन्ट्री'; वादळी वाऱ्यासह पहिल्याच पावसाने शहराला झोडपले!

पैठण दि.२२ (प्रतिनिधी)- पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या पैठणकरांना अखेर सोमवारी मान्सूनने दिलासा दिला. दुपारी चारच्या सुमारास वातावरणात अचानक बदल होऊन काळ्या ढगांनी आकाश व्यापले आणि काही क्षणांतच वादळी वाऱ्यासह मान्सूनच्या पहिल्या दमदार सरींनी शहराला झोडपून काढले

. यंदाच्या हंगामातील हा पहिलाच मान्सून पाऊस असल्याने नागरिकांसह शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले, या वादळी वार्यासह झालेल्या पावसाने पंचायत समितीच्या समोर एक झाड,व कहारवाडा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या जवळिल वडाचे झाडे या वादळी वार्याने पडले असुन ,एसटी बस स्थानक समोर पाणीच पाणी झाले,मान्सून मधील पहिला पाऊस झाल्याने अनेकांनी या पावसात भिजण्याचा आनंद देखील घेतला तर ग्रामीण भागातील जायकवाडी, पिंपळवाडी, कारखाना या परिसरात पाच मिनिटे रिमझिम पाऊस झाला.

जुन च्या शेवटचा आठवडा असताना देखील गेल्या काही दिवसांपासून तीव्र उकाडा आणि वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले होते. सोमवारी दुपारनंतर अचानक विजेच्या कडकडात सह वाऱ्यात सुरू झालेल्या पावसाने शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि सखल भाग काही काळ पाण्याखाली गेले. पावसाच्या आगमनामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून उष्णतेपासून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

खरीप हंगामाच्या तोंडावर पावसाने दिलेली ही हजेरी शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरली आहे. पावसाअभावी शेतकरी चिंतेत होते. पहिल्या दमदार सरींमुळे जमिनीत आवश्यक ओलावा निर्माण होणार असून पेरणीच्या कामांना गती मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाने समाधान व्यक्त केले.



दरम्यान, जायकवाडी धरण परिसरात रिमझिम पावसासोबत विजांचा कडकडाटही झाला,यात पहिल्या पावसाने विज पुरवठा शहरासह ग्रामीण चा बंद झाला यामुळे महावितरण चा भोंगळ कारभार पुन्हा समोर आला असुन मान्सून पुर्व कोणत्या ठिकाणी महावितरण ने झाडे तोडली कोठे कामे केली हा संशोधनाचा विषय झाला आहे.

आज शहरात वीस मिनिटे पाऊस झाला तर ग्रामीण भागात मात्र ढगाळ वातावरणात विजेचा कडकडाट झाला यामुळे वातावरणात प्रचंड उकडा निर्माण झाला.

(पान १ वरुन)

## अखेर राज्यात मान्सून पुढे सरकला,..

जागी स्थिर असणाऱ्या मान्सूनने अखेर दोन आठवड्यानंतर, आज पुणे आणि रायगड मधील अलिबागपर्यंत वाटचाल केली आहे. तसेच मध्य अरबी समुद्र, तेलंगणा, कर्नाटक राज्यातील उर्वरित भागांसह छत्तीसगड, ओडीशा, झारखंड आणि बिहारमधील काही भागातही मान्सून पुढे सरकला आहे, अशी माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिली. पुढील ४८ तासात मुंबईसह महाराष्ट्रातील इतर भागात मान्सून दाखल होण्यास हवामान स्थिती अनुकूल आहे, असेही हवामान विभागाने प्रसिद्ध केलेल्या माहितीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## कोचिंग क्लासच्या भीषण...

ते एक ॲनिमेशन केंद्र होते. येथे मुले ॲनिमेशन, म्हणजेच कार्टून बनवायला शिकायला येत होती. ही घटना नेमकी कशी झाली, याबद्दल अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. जखमींना केजीएमसी ट्रॉमा सेंटरमध्ये पाठवले जात आहेत. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या घटनेसंदर्भात उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. प्रधान सचिव (गृह) आणि डीजीपी यांना घटनास्थळी बोलावून, घटनेच्या कारणांची चौकशी करण्याचे आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर कारवाई सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा चुकीचा...

आणि अमेरिकेने २८ फेब्रुवारी रोजी इराणविरुद्ध संयुक्त युद्ध सुरू केले होते. मात्र, त्यानंतर ट्रम्प यांनी लेबनॉनवरील हल्ले सुरूच ठेवल्याबद्दल तेल अवीववर टीका केली. त्यांच्या मते, अशा कारवायांमुळे इराणसह केलेला शांतता करार धोक्यात येऊ शकतो, ज्यावर बराच काळ चर्चा सुरू होती आणि ज्यावर गेल्या आठवड्यात बुधवारी स्वाक्षरी करण्यात आली होती.

## बंडखोर खासदारांच्या मतदारसंघात...

या सभेकडे विशेष लक्ष लागले आहे.

सायंकाळी ४ वाजता उद्धव ठाकरे हिंगोली येथे पोहोचतील. हिंगोली हा बंडखोर खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचा मतदारसंघ आहे. त्यामुळे या सभेत ठाकरे बंडखोरीवर थेट भाष्य करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २८ जून रोजी सकाळी ११ वाजता परभणी येथे सभा आयोजित करण्यात आली आहे. परभणीचे खासदार संजय (बंडू) जाधव यांनी अलीकडेच ठाकरे गटाची साथ सोडल्याने या सभेला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

यानंतर दुपारी ३.३० वाजता धाराशिव येथे उद्धव ठाकरे कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. धाराशिव हा खासदार ओमराजे निंबाळकर यांचा मतदारसंघ आहे. अलीकडील राजकीय घडामोडींमध्ये ओमराजे निंबाळकर यांचे नाव विशेष चर्चेत राहिले असल्याने या सभेकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## राम मंदिर देणगी गैरव्यवहार...

सरकारने या प्रकरणाची दखल आधीच घेतलेली असल्यामुळे, सध्याच्या टप्प्यावर कोणतीही घाई किंवा तातडी नाही.

याचिकाकर्ते मोहित अशोक यांनी राम मंदिराच्या दानपेटीतून झालेल्या कथित अपहाराची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. याबरोबरच भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्यामार्फत या प्रकरणाचे लेखापरीक्षण करण्याचे आदेश द्यावेत, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

## ममता बॅनर्जी यांना अध्यक्षपदावरून...

आणि कोलकाता महानगरपालिकेसह तीन जिल्ह्यांतील तब्बल ७० नगरसेवक उपस्थित होते. या बैठकीत हावडा मध्यचे ज्येष्ठ आमदार अरूप रॉय यांची ममता बॅनर्जी यांच्या जागी पक्षाचे नवीन चेअरपर्सन म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षातील या ऐतिहासिक बंडखोरीचे समर्थन करताना ऋतब्रत बॅनर्जी म्हणाले, ''पक्षात सध्या मोठे घटनात्मक संकट निर्माण झाले होते. पक्षाच्या घटनेनुसार दर तीन वर्षांनी राष्ट्रीय कार्यकारी समितीची स्थापना करणे बंधनकारक आहे. शेवटची समिती फेब्रुवारी २०२२ मध्ये स्थापन करण्यात आली होती. पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपूनही पक्षाच्या रचनेत कोणतेही बदल करण्यात आले नाहीत. त्यामुळे पक्षाचे अस्तित्व आणि घटना वाचवण्यासाठी आम्हाला हे पाऊल उचलणे भाग पडले.'' असे ते म्हणाले.

# फुटीर खासदारांना निवडून आणण्यासाठी जीवाचं रान केलं, पण त्यांनी विश्वासघात केला; शेकापचे अजित नवले आक्रमक

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- राज्यातील सहा खासदारांनी शिंदेसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. या सहाही खासदारांना लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि संविधान रक्षणाच्या मुद्द्यावर महाविकास आघाडी म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने निवडणुकीत पाठिंबा दिला होता असे किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले म्हणाले. भारतीय जनता पक्ष आणि मित्र पक्षांच्या विरोधामध्ये प्रचार करून राज्यभरातील माकपचे कार्यकर्ते आणि जनसंघटनांनी महाविकास आघाडीच्या या खासदारांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान केले होते. मात्र आता हे खासदार, ज्या भारतीय जनता पक्षाच्या विरोधामध्ये जनता, महाविकास आघाडीचे सामान्य कार्यकर्ते व डावे पक्ष प्राणपणाने लढले, त्याच भाजपला पाठिंबा देण्यासाठी शिंदे सेनेत जाऊन मिळाले आहेत. जनतेचा व निवडणुकीत या खासदारांना निवडून आणण्यासाठी कोणतीही अपेक्षा न ठेवता काम केलेल्या डाव्या पक्षांच्या आणि संघटनांच्या कार्यकर्त्यांचा हा घोर विश्वासघात असल्याचे मत अजित नवलेंनी व्यक्त केले. त्यामुळं या राजकीय गद्दारीच्या विरोधात माकप राज्यभर तीव्र निदर्शने करणार असल्याचे त्यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीपूर्वी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सत्ताधारी पक्षांनी फूट पाडली होती. जनतेमध्ये या फुटीच्या विरोधात व आमदारांनी केलेल्या पक्षांतराच्या विरोधात तीव्र असंतोष होता. कांदा व दुधाचे भाव पाडल्याने सुद्धा भारतीय जनता पक्षाच्या विरोधामध्ये तीव्र संतापाची भावना शेतकऱ्यांमध्ये होती. किसान सभा व शेतकऱ्यांच्या आंदोलनातून ती तीव्रपणाने व्यक्त झाली होती. याचा परिणाम म्हणून जनतेने भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना नाकारत महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी केले होते असे नवले म्हणाले.

यापूर्वी सुद्धा सुरुवातीला एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली व नंतर अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली अशाच प्रकारे आमदारांनी पक्षांतर केले. ते महाविकास आघाडीचे उमेदवार असतानाना, त्यांना निवडून आणण्यासाठी सुद्धा डाव्या पक्षांनी महाराष्ट्रभर आपले योगदान दिले होते. डावे पक्ष आणि त्यांच्या सर्व संघटना जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने जीवाचे रान करत संघर्ष करतात. साधन संपत्ती व पैसा उपलब्ध नसतानाही उपाशी तापाशी राहून संघटना बांधतात. महाविकास आघाडी सारखे पक्ष डाव्या पक्षांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना निवडणुकीत उमेदवार म्हणून न्याय देत नाहीत. तात्विक बांधिलकी नसलेल्या मात्र पैसा लावून निवडणूक जिंकण्याची क्षमता असलेल्या लोकांना उमेदवारी दिली जाते. प्रामाणिकपणाने तत्वनिष्ठेने काम करणाऱ्या डाव्या पक्षांच्या कार्यकर्त्यांना मात्र योग्य जागा देण्याचे टाळले जाते. असे असताना पैसा आणि यंत्रणा उभी करण्याची क्षमता पाहून उमेदवारी दिलेले आणि मग निवडून आलेले लोक महाविकास आघाडीच्या या तिन्ही पक्षांमध्ये टिकतात का? हा प्रश्न या पार्श्वभूमीवर उपस्थित झाला आहे. महाविकास आघाडीतील पक्षांनी याबाबत आत्मचिंतन करण्याची व योग्य त्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. धर्मनिरपेक्षता, लोकशाही, जनतेचे खरे खुरे हित, संविधान रक्षण यासारख्या नीतिमूल्यांची कोणतीही चाड नसलेल्या मात्र केवळ बक्कळ अवैध पैसा असलेल्या लोकांना आपण उमेदवारी दिल्यास काय परिणाम होतो याचा पुनर्विचार या पक्षांनी केला पाहिजे.